भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २१९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०४/२०१८

**१) ट्रक बेदरकार पणे चालवुन पोलीस गाडीला धडक देवुन नुकसान करून, अवैधरीत्या बिना पास परवाना देशी दारू ट्रकमध्ये वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोद;–**

दिनांक २५/०४/२०१८ चे २२.३० ते २६/०४/२०१८ चे ००.३० वाजता. दरम्यान यातील गुप्त माहीती द्वारा मार्फत मिळालेल्या माहीती नुसार वैनगंगा नदी पुलीया ताडेश्वर वार्ड पवनी येथे सोबत मा.उपवीभागीय पोलीस अधीकारी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टॉप सह सयुक्त रित्या नाकाबंदी करीत असता, समोरून येणाऱ्या ट्रकला थांबवीण्याचा इसारा केला तेव्हा ट्रक चालक याने ट्रक न थांबवीता ट्रक बेदरकारपणे चालवुन पोलीस गाडीला डावे बाजुला धडक मारून १५,०००/रु चे नुकसान करून पडुन जात असतांना त्याचा पाठलाग केला, पोलीस गाडी पाठलाग करीत असल्याचे पाहुन आपले ट्रक थांबवुन खाली उतरून पडुन गेला, सदर ट्रकची पंचासमक्ष पाहणी केली असता, ट्रकमध्ये टायगर ब्रांड देशी दारू संत्रीचे ३५० खडयाचे बॉक्स ज्यामध्ये प्रत्येकी १०० प्लास्टीक पव्वे ९० एमएल देशी दारूने भरलेले ३५००० पव्वे प्रत्येकी कि. २६/रु. एकुण किमती ९,१०,०००/रु. सुप्रम नं. १ देशी दारूचे २१० खरडयाचे बॉक्स त्यामध्ये प्रत्येकी १०० प्लास्टीक पव्वे प्रत्येकी ९० एमएलनी देशी दारूने भरलेले २१०० पव्वे प्रत्येकी २६/रु. एकुण ५,४६,०००/रु. देशी दारू टॉनीक रॉकेट संत्रा प्रवरा डिसटीली प्रवरा नगर लिहलेला खरडयाचे ९० बॉक्स ज्यामध्ये १०० प्लास्टीक पव्वे ९० एमएल देशी दारूने भरलेले ९,००० पव्वे प्रत्येकी २६/रु. एकुण किमती २,३४,०००/रु., आयसर कंपनीचा कथीया रंगाचा १० चक्का ट्रक किमती, ४,१०,०००/रु. असा एकुण ६५० देशी दारूच्या पेटया किमती कि. १६,९०,०००/रु. असा एकुण २१,००,०००/रु. चा माल अवैधरीत्या बिना पास परवाना देशी दारू ट्रकमध्ये वाहतुक करतांनी मिळुन आला करीता ट्रक क्र. एमएच २७ एस्क २७८१ चा चालका विरूध्द सरतर्फे फिर्यादी पोनी. चकाटे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ६५ ई मदका. सहकलम २७९, ३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत

**२) मोबाईलची चोरी ;–**

दिनांक २६/०४/२०१८ चे १७.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा त्याची बहिन दिव्या भगत हीला बसस्थानक वर सोडण्यास गेला असता आरोपीने गर्दीचा फायदा घेवुन बस मध्ये चढतांनी फिर्यादीचे बहीनीचे बॅग मध्ये ठेवलेला एमएफई कंपनीचा क्वेरी किपॅडचा मोबाईल कि. १,२००/रु .चा बॅग मधुन आरोपीने चोरून नेल्याने, फिर्यादी हितेश शेषराव भिवगडे वय २५ वर्ष रा. पंचशिल वार्ड साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) जनावरांना वेदना होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २६/०४/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील ०७ बैल जनावरे किमती २१,००/रु. चे जनावरे यांना एकमेकास जवळजवळ बांधुन त्यांना चालता येत नव्हते, त्यांना ऊन लागत होते, त्यांना मारत–मारत आणत होते, आमचे समक्ष बैलांना वेदना होत असल्यामुळे,त्यांना गौशाला लाखनी येथे पाठविण्यात आले. सरतर्फे फिर्यादी पो.नी. गुरणुले यांचे रिपोर्ट वरून रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ११(१)(क) प्रा.कृ.वा. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. गुरणुले पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

४) मोटार सायकलची मोटार सायकलला धडक लागुन दोन जखमी :–

दिनांक २६/०४/२०१८ चे १८.३० वाजता. दरम्यान यातील जखमी फिर्यादी हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३५ /७६३० ने लाखनी कडुन सालेभाटा कडे जात असतांनी यातील आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन जखमी फिर्यादीचे मोटार सायकलला आमोरासमोर धडक मारून फिर्यादीस व मागे बसलेल्या ईसमास गंभिर जखमी करून व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने, जखमी फिर्यादी सचिन रमेयश टेंभरे वय ३० वर्ष रा. मोरगाव राजेगाव यांचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

५) घरघुती गॅस सिलेंडचा व्यवसायीक कामाकरीता वापर करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २६/०४/२०१८ चे १८.०० यातील आरोपीने आठवडी बाजार वरठी येथील जयगुरू देव सेव चिवडा दुकानातील १ एच.पी. कंपनीचा घरघुती गॅस सिलेडर कि. ३,०००/रु. चा सहयाने सेव तयार करीत असतांनी मिळुन आल्याने, तसेच घरघुती गॅस सिलेंडरचा त्याचे व्यवसायीक कामाकरीता वापर करून काळा बाजार करतांनी मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यदी पोना. फुलबांधे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३,७ जिवनावश्यक वस्तु अधीनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊके पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) दारू पिवुन वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २५/०४/२०१८ चे २१.४९ वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील हिरो होंडा प्लस वर बसुन साकोली स्टेट बॅक समोर दारूचे नशेत रोडभर वाकडी तिकडी मोटार सायकल चालवुन दुस–याचे जिवीतास धोका पोहचविण्याचे उददेशाने मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

७) गळफास लावुन महिलेचा मृत्यु :–

दिंनाक २६/०४/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नरेद्र आरकु नखाते वय ३९ वर्ष रा. भेंडाळा हा व याची मृतक पत्नी सौ. कलावती उर्फ नम्रता नरेद्र नखाते वय ३६ वर्ष रा. भेंडाळा व मुले घेवुन कुंटुबासह बेलाटी येथे खाजगी दवाखान्यात जावुन डॉक्टरचे काम करीत असता मृतक पत्नीने येथे मुलाचे शिक्षण होत नाही बोलली तेव्हा फिर्यादीने पत्नीसह मुलांना स्वत:चे घरी भेंडाळा येथे आणुन ठेवले होते यातील फिर्यादीचा भाऊ अविन आरकु नखाते वय २८ वर्ष रा. याने फोन द्वारे माहीती दिली की, सौ. नम्रता नरेद्र नखाते हीने घरी कुणीही हजर नसतांना राहते घराचे बेडरूम मध्ये सिलींग फॅनला दुपटयाने घळफास घेवुन मरण पावली आहे. असे फिर्यादीचे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत

८) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–

दिनांक २६/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, मोहाडी, कारधा, तुमसर, करडी, तुमसर, आंधळगाव, साकोली, लाखनी व लाखांदुर येथे अवैध हातभट्टी +देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण १३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ९२ लिटर हातभंट्टी दारू + १०७५ किलो सडवा + २१६० किलो मोहाफुल + साहीत्य + १ पिकप चारचाकी वाहन किंमती २,६७,१९०/रु. व ९०० मिली लिटर देशी+ साहीत्य दारु किंमती १११/–रु. तसेच जुगारातुन २,०८०/रु. असा एकुण किंमती २,६९,३८९/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २६/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०१ तीन सिटर वाहनाकरीता– ३ ईतर वाहनांवरती – ७६ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
महिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.